## निवडक

### ब्रह्मकरमळी येथील शांतादुर्गा देवस्थानचा उद्या वार्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड



**वाळपई, दि. २१**: ब्रम्हा करमळी सत्तरी येथील श्री शांतादुर्गा देवस्थानचा चौदावा वर्धांपनदिन येत्या शुक्रवार दिनांक २३ मे रोजी खालीलप्रमाणे विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमानिशी साजरा करण्यात येणार आहे. शुक्रवार दिनांक २३ मे रोजी सकाळी ९ वाजता धार्मिक कृत्ये, होम हवन, पूर्ण आहुती, दुपारी १२.३० वाजता सार्वजनिक प्रार्थना, १ ते ३ महाप्रसाद, रात्री ९ वाजता अमृतनाथ सिद्धेश्वर दशावतार नाट्य मंडळ म्हापण वेंगुर्ले तर्फे दशावतारी नाट्य प्रयोग सादर होणार आहे.

श्री शांतादुर्गा देवस्थान हे ब्रह्मकरमळी गावातील ग्राम दैवत आहे. सुरुवातीला देवीच्या रूपाने ह्या देवस्थानात वारुळाची पूजा व्हायची. नंतर ग्रामस्थांनी मंदिरात शांतादुर्गा देवीच्या मूर्तीची स्थापना केली. या मंदिराच्या माध्यमातून गावात शिगमोत्सव आणि धालोत्सव असे उत्सव होत असतात. गुढी पाडव्याच्या दिनी मंदिरात सार्वजनिक पूजा होत असते. हे एक जागृत देवस्थान आहे. तरी वरील कार्यक्रमास सहकुटुंब सह परिवार उपस्थित राहून देवीच्या कृपा प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# डिचोलीत मुसळधार; अनेक ठिकाणी पडझड





डिचोलीत : हमरस्त्यावर पडलेला वृक्ष हटवताना अग्नीशामक दलाचे जवान. दुसऱ्या छायाचित्रात रस्त्यावर तुंबलेले पाणी निचरा करण्यासाठी कामात गुंतलेला पालिका कर्मचारी.

■ टीम दैनिक हेराल्ड

## आपत्कालीन यंत्रणा सजग ठेवा मुख्यमंत्र्यांचे आदेश

**डिचोली, दि. २१** : डिचोली तालुक्यात मानसून व पूर्व पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत करताना अनेक ठिकाणी पडझड रस्त्यावर पाणीसाचल्याने काही ठिकाणी दुकान हॉटेलमध्ये पाणी शिरले. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी राज्यातील सर्व तालुक्यातील आपत्कालीन नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

जिल्हाधिकारी उपजिल्हाधिकारी मामलेदार तलाठी यांनी आपापल्या तालुक्यात यंत्रणा सज्जत ठेवताना सर्व ती खबरदारी घ्यावी. तसेच गरज पडते त्या ठिकाणी तातडीने मदत कार्य करावे, अशा प्रकारचे आदेश मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी जिल्हाधिकारी व तालुका नियंत्रण यंत्रणे स दिले आहेत.

कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने मुसळधार पाऊस सुरू असून हवामान अंदाजानुसार अजून काही दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे, त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिलेले आहेत.

आपण परवाच विशेष बैठक घेऊन तपशीलवार आढावा घेतला होता. मात्रआता अचानक पावसाने झोडपल्याने ज्या ठिकाणी काही समस्या निर्माण होत असल्यास आपत्कालिन नियंत्रण कक्षाने सजय राहून मदत कार्य करावे अशा प्रकारचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. विशेष करून डिचोली तालुक्यात अनेक ठिकाणी पाणी साचून लोकांची गैरसोय झाली काही ठिकाणी पडझड झाली असून अग्निशामक दलाचे जवान मदत कार्यात गुंतलेले आहेत नगरपालिका पंचायती तसेच मामलेदार कार्यालय यांनी पाण्याचा निचरा व्यवस्थित तातडीने उपाययोजना करण्याचे आदेशही देण्यात आलेले आहेत.

तालुक्यात अनेक ठिकाणी पडझड झालेली असून लाखभर रुपयाचे नुकसानही झाले आहे तालुक्यात अनेक ठिकाणी गटार उपसणे व स्वच्छता कामकाज सुरू असताना मान्सून व पूर्व पावसाने धुमशान घातल्याने लोकांची पूर्णपणे धांदल उडाली. या पार्श्वभूमीवर सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे डिचोली भागात पावसाचा जोर सुरूच अनेक ठिकाणी पडझड झाल्याची माहिती अग्निशमक दलाचे अधिकारी राहुल देसाई यांनी दिली.

# फोंडा परिसरात पावसामुळे रस्ते खचले

## रस्ता खचल्यामुळे अपघातांची शक्यता | वाहतूक सुरक्षेचा प्रश्न गंभीर

■ टीम दैनिक हेराल्ड




**फोंडा, दि. २१** : फोंडा तालुक्यात मुसळधार पावसामुळे राष्ट्रीय महामार्ग आणि संबंधित सर्व्हिस रोडवर मोठे नुकसान झाले असून, वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कुर्टी ते खांडेपार या मार्गावर नव्याने बांधलेल्या सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी रस्ता खचल्यामुळे अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे.

स्थानिक रहिवासी उमेश नाईक यांनी सांगितले की, या रस्त्यावरून वाहने हळूगतीने चालविणे आवश्यक आहे. त्यामुळे येथे सतर्कतेचे साइनबोर्ड लावणे अत्यावश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, हा रस्ता नुकताच बांधण्यात आला असूनदेखील त्याची अवस्था खालावली आहे, जो गंभीर चिंता व्यक्त करणारा मुद्दा आहे.

दरम्यान, ढवळी–फर्मागुडी महामार्गावरील कपिलेश्वरी येथील सर्व्हिस रोड गेल्या दोन दिवसांपासून पाण्याखाली गेला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, गटारे तुंबल्याने पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. परिणामी, रस्त्यावर पाणी साचून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने गटारे स्वच्छ करून रस्ता वाहतुकीस योग्य बनवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याच भागात एका खाजगी संस्थेच्या रस्त्यालगत असलेल्या भिंतीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे परिसरातील प्रवाशांना धोका निर्माण झाला आहे.

फोंडा तालुक्यात गेल्या दोन दिवसांत पावसामुळे अनेक अनुचित घटना घडल्या आहेत. फोंडा अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा विभागाला विजेच्या तारांसह रस्त्यावर पडलेल्या झाडांचे १७ कॉल प्राप्त झाले होते. विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली.

बुधवारी सकाळी कामत नर्सिंग होमजवळ एक मोठे झाड पार्क केलेल्या सायकलींवर कोसळले. या घटनेत सुमारे १७ सायकलींचे किरकोळ नुकसान झाले. याशिवाय, खडपणबांद येथे एका घरावर झाड कोसळून घराचेही थोडेफार नुकसान झाले. आडपई –दुर्भाट रस्त्यावर झाड पडल्याने तो रस्ता काही काळ वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता; मात्र अग्निशमन दलाच्या मदतीने तो पुन्हा खुला करण्यात आला. पावसाळ्यापूर्वी योग्य उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असून, स्थानिक प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# परवाना शुल्कात कपात करण्याची शॅक मालकांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**कळंगुट, दि. २१** : गोव्यातील समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन हंगाम अखेरच्या टप्प्यात असताना, यंदाच्या मोसमात अनेक बीच शॅक मालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. परिणामी, शॅक ओनर्स वेल्फेअर सोसायटीने आगामी हंगामासाठी शॅक परवाना शुल्कात किमान पातळीपर्यंत कपात करण्याची मागणी सरकारकडे आणि पर्यटन विभागाकडे केली आहे.

बागा येथे पत्रकारांशी संवाद साधताना शॅक ओनर्स वेल्फेअर सोसायटीचे सरचिटणीस जॉन लोबो यांनी सांगितले की, आम्ही सरकार आणि पर्यटन विभागाला विनंती करत आहोत की, शॅक परवाना शुल्क कमी करण्यात यावे. या हंगामात अनेक शॅक मालकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. एकूण खर्च वाढलेला असताना, परवाना शुल्क सुमारे १.५ लाख रुपये किंवा त्याहून अधिक आहे. याशिवाय, उत्पादन शुल्क सुमारे ३० ते ४० हजार रुपये आहे आणि वीज जोडणीसाठी प्रारंभीच आम्हाला ३.५ लाख रुपये भरावे लागतात.

लोबो यांनी स्पष्ट केले की, शॅकच्या उभारणीचा सर्व खर्च आणि त्यावरील इतर खर्चही शॅक मालकांवरच आहे. शासन आम्हाला कोणतीही संरचना उपलब्ध करून देत नाही. मग इतके जास्त शुल्क आकारण्याचे कारण काय, हे आमच्यासाठी समजण्यापलीकडे आहे, असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी असेही निदर्शनास आणले की, यावर्षी देशी–विदेशी पर्यटकांची संख्या घटल्यामुळे हंगाम संपण्याच्या दोन महिने आधीच अनेक शॅक बंद करण्यात आले आहेत. सध्या मुख्य कळंगुट बीच, बागा आणि इतर प्रमुख ठिकाणी काही मोजक्याच शॅक सुरू आहेत. हे उर्वरित शॅक किमान जूनच्या मध्यापर्यंत सुरू ठेवले जावेत, जेणेकरून मालकांना त्यांच्या गुंतवणुकीचा काही भाग तरी परत मिळवता येईल, असे लोबो यांनी सांगितले.

मे महिन्याच्या सुट्यांमुळे अजूनही देशांतर्गत पर्यटक गोव्यात येत आहेत. त्यामुळे हंगाम जूनच्या मध्यापर्यंत ताणता येऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. लोबो यांनी यावेळी सांगितले की, पर्यटनाशी संबंधित विविध हितधारक आणि पर्यटन विभाग तसेच पर्यटन मंत्री यांच्यासोबत नियमित बैठकांचे आयोजन करण्यात येते. पर्यटन मंत्र्यांनी कमी पर्यटकांमागील कारणांचा सखोल अभ्यास करण्यासाठी आमच्याकडून अभिप्राय मागवला आहे. शॅक मालक, जलक्रीडा संचालक, लघु व मध्यम दर्जाचे अतिथीगृह चालक, ट्रॅव्हल एजन्सीज अशा अनेक घटकांनी यासंदर्भात विविध सूचना दिल्या आहेत. आम्हाला आशा आहे की, पर्यटन विभाग यावर सकारात्मक पावले उचलेल आणि येत्या हंगामात स्थिती सुधारेल, असेही लोबो यांनी नमूद केले.

## खराब नेटवर्कमुळे त्रस्त साकोर्डावासीयांची बीएसएनएलवर धडक

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २१** : धारबांदोडा तालुक्यातील साकोर्डा ग्रामपंचायत क्षेत्रातील स्थानिक रहिवासी मोबाईल नेटवर्क समस्यांबाबत तक्रार घेऊन सोमवारी फोंडा येथील बीएसएनएल कार्यालयात दाखल झाले. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या खराब मोबाईल कनेक्टिव्हिटीमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी, अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असतानाही, उपस्थित कर्मचाऱ्यांकडे नाराजी व्यक्त केली आणि समस्येच्या तात्काळ समाधानाची मागणी करत निवेदन सादर केले.

ग्रामस्थांनी सांगितले की, मागील वर्षभरापासून साकोर्डा भागात मोबाईल नेटवर्क अत्यंत खराब असून याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी वर्गाला बसत आहे. शिक्षण, ऑनलाइन फॉर्म भरणे तसेच अन्य डिजिटल सेवांचा वापर करण्यामध्ये त्यांना सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. साकोर्डा गावच्या सरपंच संजना नार्वेकर यांनी सांगितले की, आमच्या गावात मोबाईल कनेक्टिव्हिटी फारच खराब आहे. आपत्कालीन प्रसंगी देखील लोकांना मदतीसाठी संपर्क साधता येत नाही. आमच्या भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, या समस्येकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. आम्ही फेब्रुवारी २०२५ मध्ये बीएसएनएल नेटवर्कला ४जीमध्ये रूपांतर करण्याबाबत अधिकृत पत्र दिले होते. परंतु आज कार्यालयात भेट दिल्यानंतर सांगण्यात आले की संबंधित अधिकारी रजेवर आहेत.

पंचायत सदस्य महादेव शेटकर यांनीही समस्येचे गांभीर्य अधोरेखित करत म्हटले, आमच्या भागात सध्या तीन ते चार बीएसएनएल टॉवर्स आहेत, पण कनेक्टिव्हिटी जवळपास शून्य आहे. केवळ मोबाईल टॉवर उभारल्याने उपयोग नाही, ते कार्यक्षम असणे गरजेचे आहे. कॉल ड्रॉप, मंद इंटरनेट स्पीड आणि सतत अडथळ्यांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेटकर पुढे म्हणाले की, शैक्षणिक गरजा, डिजिटल व्यवहार आणि ऑनलाइन सेवांच्या वाढत्या वापरामुळे सशक्त व स्थिर नेटवर्क ही काळाची गरज बनली आहे. सध्या अस्तित्वात असलेली पायाभूत सुविधा कालबाह्य झाली असून ती गावकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहे. ग्रामस्थांनी बीएसएनएलकडून लवकरात लवकर ४जी सेवा सुरू करून कार्यक्षम नेटवर्क सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात तातडीने पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.




The all-new Škoda Kylaq. Own Your Dream.

Best-in-class

Boot space of 446 L | 6-way electrically adjustable seats for driver and co-driver | R17 Dual tone alloy wheels | Powerful, efficient and reliable 1.0 TSI engine

1 Year Complimentary SuperCare Package | 3 Year Standard Warranty** Roadside Assistance | 280+ touchpoints across India | Toll-free 1800 2700 260 www.skoda-auto.co.in | Test drive now

**Sales: Goa:** (Taleigao) Emporium Automobile: 75740 44499; (Margao) Emporium Automobile: 75740 44499

**Service: Goa:** Emporium Automobile: 0832-2979733 / 34

T&C apply.*Sub-4 metre ICE vehicles, as per the BNCAP Rating. **The Škoda Kylaq comes with a standard warranty of 3 years or 100,000 km, whichever comes first. Škoda reserves the right to alter the details of specifications and service offerings without any prior notice. Images are for representation purposes only. Actual colour, features and specifications may vary. Above car picture is created with the help of computer graphics solely for the purpose of advertising. All disputes are subject to Mumbai court's jurisdiction only.